**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व**
**मानव विकास संस्था (सारथी), पुणे.**
(महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागासवर्ग कल्याण विभागाची स्वायत्त संस्था)

बालचित्रवाणी, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

# शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत

***——————***

## ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख १ नोव्हेंबर, २०१९.

**ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी खालील बाबी व्यवस्थितरित्या समजून घेवून, विचार करून अर्ज भरण्याची कार्यवाही शुरु करावी.**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा दि.१७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार, शासकीय/ निमशासकीय सेवेतून सेवानिवृत अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेसाठी ‘सारथी’ पुणे कडून वृतमान पत्रात जाहिरात देवून सेवा निवृत्त पात्र अधिकाऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. सारथी मध्ये विवक्षित कामांची तात्पुरती यादी खालील प्रमाणे असून पात्र उमेदवारांनी आपली क्षमता, ज्ञान, कौशल्य व अनुभव पाहून अर्ज करावे.

**पार्श्वभुमी :-** 'सारथी' संस्थेमध्ये विवक्षित कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या शासकीय/ निमशासकीय विभागामधून किंवा महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्थ कोणत्याही उपक्रम/ महामंडळ/ मंडळ/ संविधिक संस्था/ प्राधिकरण/ इतर स्वायत्त संस्थामधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची नामिका सूची (Empanelment) करण्याचे नियोजिले आहे. अर्जदार मंत्रालयातून किंवा उपरोक्त प्रमाणे नमूद केल्यानुसार शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी असावा व सेवा निवृत्तीच्या पूर्वी अवर सचिव किंवा समकक्ष दर्जाचा किंवा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी असावा.

सदर नामिकासूची (Empanelment) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल व विवक्षित कामांसाठी करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांसाठी याच शासन निर्णयातील सर्व तरतुदी लागू होतल. ज्या संबधित सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने काम दिले जाईल, त्यांना सदर शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

**उमेदवारांनी अर्ज केल्यामुळे त्यांचा नामिका सूचि मध्ये समाविष्ट होईल. (Empanelment होईल) असे गृहित धरता येणार नाही. तसेच नामिकासूचीत समाविष्ट झाल्यामुळे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस काम मिळेल, याची कोणतीही हमी देण्यात येणार नाही. अधिकाऱ्याचा अनुभव व त्याचा विवक्षित कामांबाबतचा ज्ञान, अनुभव, कौशल्य, इ. अभ्यास याचा विचार करुन आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीकरीता वरील शासन निर्णयानुसार नियुक्तीबाबत भविष्यात गरजेनुसार कार्यवाही करण्यात येईल.**

सदर विषयी भविष्यात कोणतीही माहिती / सुचना, इत्यादी उपरोक्त लिंकवरच दिली जाईल. वृत्तपत्राात जाहिरात दिली जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी http://www.sarthi-maharashtragov.in>NOTICE BOARD> EMPANELHR पाहत राहावे.

**Advt/EMPANELHR/01.11.2019/I**

सारथी मध्ये “विवक्षित कामांसाठी” विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी नामिका सूची (Panel) तयार करण्याबाबत तात्पुरती विषयसुची खालील प्रमाणे आहे. सदर विषय सूचित सध्या, एकूण ३४ विषयांचा समावेश असून पुढील तीन महिन्यात यात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सद्यास्थितीत ‘सारथी’ संस्थेमध्ये ३४ विवक्षित कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या शासकीय / निमशासकीय विभागामधून किंवा महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्थ कोणत्याही उपक्रम / महामंडळ / मंडळ / संविधिक संस्था / प्राधिकरण / इतर स्वायत्त संस्थामधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची नामिका सूची (Empanelment) करण्याचे नियोजिले आहे. अर्जदार मंत्रालयातून किंवा उपरोक्त प्रमाणे नमूद केल्यानुसार शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी असावा व सेवा निवृत्तीच्या पूर्वी अवर सचिव किंवा समकक्ष दर्जाचा किंवा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी असावा.

तरी उपरोक्त नमूद केलेल्या दर्जाच्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांमधून इच्छुक कोणत्याही व्यक्तिनां सध्याच्या कामाच्या यादीमधून जास्तीत जास्त पाच कामांची निवड करून त्याकरीता करार पध्दतीने काम करण्यासाठी अर्ज करण्यास सूट आहे. मात्र तसे करीत असतांना संबधित अधिकाऱ्यांनी निवड केलेल्या कमाल पाच कामांपैकी, प्रत्येक कामासाठी त्यांची पसंती क्रमांक देणे आवश्यक आहे. कोणत्याही कामाची निवड करून पसंती क्रमांक देण्यापूर्वी संबंधी अधिकाऱ्यांनी त्या विषयांमधील त्यांचे अभ्यास, ज्ञान, कौशल्य अनुभव, इत्यादी लक्षात घेणे आवश्यक आहे. ज्या विषयाची निवड संबधित अर्जदार करणार, त्या विषयांच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार सारथीच्या तज्ञ समितीकडून त्याची मुलाखत घेण्यात येईल व संबधित विषयांबाबत संबधित अर्जदाराचा अभ्यास, कौशल्य, ज्ञान, अनुभव, इत्यादी विचारात घेवून सारथीची तज्ञ समिती आपली शिफारीश करेल. सदर मुलाखत प्रत्यक्ष किंवा व्हिडिओ इत्यादी द्वारे घेण्यासाठी विशिष्ट प्रकरणी विचार करण्यात येईल.

## नामिकासूचितील समाविष्ट होणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसाठी तात्पुरता अटी व शर्ती

## [Tentative Terms & Conditions for the retired officers to be empaneled]

१. सुरुवातीला एमपॅनलमेंट (Empanelment) तीन वर्षांच्या कालावधीकरीता करण्यात येईल व त्याबाबत वार्षिक आढावा घेऊन विषय किंवा Panel च्या सदस्यांमध्ये वाढ किंवा घट करण्यात येईल.

२. विवक्षिम कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त सहा महिन्यासाठी देण्यात येईल व आवश्यकता असल्यास नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करण्यात येईल. परंतु असा एकूण कालावधी एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही. सहा महिन्यात केलेल्या कामकाजाचा व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांचेकडून आढावा घेतल्यानंतर कामाची व्याप्ती लक्षात घेऊन वाढीव कालावधीकरिता कराराचे नुतनीकरण करण्यात येईल.

३. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७-१२-२०१६ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

४. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

५. करार पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षापेक्षा अधिक नसेल.

६. असा सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असलेबाबत तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असल्याबाबत खातरजमा करण्यात येईल.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, व्यवस्थापकीय संचालक, सारथी संस्था यांनी निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवा घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात येईल.

८. अशा अधिकाऱ्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी किंवा फौजदारी प्रकरण चालू नसावे. सेवा कालावधीत काही शिक्षा झाली असल्यास त्याबाबत माहिती देण्यात यावी.

९. व्यवस्थापकीय संचालक, 'सारथी' यांना सेवानिवृत्त अधिकाऱ्याची करार पद्धतीवरील सेवा कोणत्याही वेळी, कुठलेही कारण न देता किंवा नोटीस न देता समाप्त करण्याचा अधिकार राहील.

१०. असा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहिर करणे आवश्यक राहील.

११. अशा अधिकाऱ्यांना शासकीय वाहन अनुज्ञेय / उपलब्ध असणार नाही. तसेच अशा अधिकारी यांना सारथी संस्थेच्या कामकाजासाठी आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. अशा करार पध्दतीवरील नियुक्त अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असतील.

१४. नियुक्त करण्यता आलेले अधिकारी यांना त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत व्यवस्थापकीय संचालक, सारथी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१५. करार पद्धतीने नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडे सोपविण्यात येणाऱ्या कामाचे स्वरूप, व्याप्ती इत्यादी संदर्भात व्यवस्थापकीय संचालक, 'सारथी' यांचा निर्णय अंतिम असेल.

१६. करार पध्दतीने घेण्यात येणाऱ्या अधिकारी यांची बैठक व्यवस्था उपलब्ध असलेल्या जागेनुसार करण्यात येईल.

१७. अशा अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७-१२-२०१६ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

१८. सारथी संस्थेची इतर अटी व शर्ती

## सद्यस्थितीत निश्चित केलेल्या विवक्षित कामांच्या विषयांची तात्पुरती यादी :-

१. सारथी संस्थेच्या लक्षित गटाच्या उमेदवारांच्या खाजगी जमिनीवर त्यांच्या मार्फत वानिकी (forestry) विषयक विविध उपक्रमाचे स्वरूप, व्याप, रूपरेषा, अंमलबजावणीसाठी येणारा खर्च, शेतकऱ्यांना अश्या उपक्रमातून होणारे फायदे, पर्यावरण, मृद संधारण, जलसंवर्धन, इ. मुळे होणारे फायदे खाजगी पडिक कोरडवाहू जमिनीवर वनिकीचे अर्थशास्त्र (Economics of forestry on waste land/ dry land/ unirrigated fallow land, इ.) इ. बाबतचा अहवाल तयार करणे.

२. सारथी संस्थेच्या लक्षित गटाच्या उमेदवारांच्या खाजगी जमिनीवर त्यांच्यामार्फत वनशेती (Agro forestry) व औषधी वनस्पती (Medicinal Plants) विषयक विविध उपक्रमाचे स्वरूप, व्याप, रूपरेषा, अंमलबजावणीसाठी येणारा खर्च, शेतकऱ्यांना अश्या उपक्रमातून होणारे फायदे; पर्यावरण, मृद संधारण,

जलसंवर्धन, इ. मुळे होणारे फायदे, खाजगी पडिक कोरडवाहू जमिनीवर वनिकीचा अर्थशास्त्र (Economics of forestry on waste land/ dry land/ unirrigated fallow land, इ.) इ. बाबतचा अहवाल तयार करणे.

३. सारथी संस्थेच्या लक्षित गटाच्या उमेदवारांच्या खाजगी जमिनीवर त्यांच्या मार्फत बांबू व इतर प्रजातीच्या लागवडीला चालना देण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे स्वरूप, व्याप, रूपरेषा, अंमलबजावणीसाठी येणारा खर्च, शेतकऱ्यांना फायदा तसेच सदर बांबू व इतर प्रजाती लागवडी, संगोपन, पीक निष्कासन (harvesting), विपणन उद्योग, इत्यादीच्या अर्थशास्त्राबाबतचा अहवाल तयार करणे व या विषयी प्रबोधन, जाणीव जागृतीसाठी साहित्य, कार्यक्रम, प्रसिध्दी व प्रसाराचा अहवाल व आराखडा तयार करणे.

४. वनेतर जमिनीवर असलेल्या जैवविविधताच्या संवर्धनासाठी लक्षित गटातील शेतकऱ्यांना प्रबोधन व मार्गदर्शन करण्यासाठी व सदर उपक्रम राबविण्यासाठी त्याची क्षमता वृध्दी कार्यक्रम तयार करणे व त्याच्या अमंलबजावणीसाठी आराखडा तयार करणे.

५. बांबू समुहांची (Bamboo Clusters) निर्मिती करून त्याद्वारे बांबू लागवड, बांबूशी निगडीत हस्तकला व उद्योग विकसीत करणे आणि उद्यमशिलता, विपणन, कौशल्य विकास इत्यादिंना प्रोत्साहन देणे यासाठी सविस्तर नियोजन आराखडा (DPR) तयार करणे, व DPR ची अंमलबजावणी,

६. संस्थेच्या उपरोक्त कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी शासकीय/ निमशासकीय विभाग तसेच स्वयंसेवी संस्था यांच्याशी सुसंवाद साधणेसाठी नियोजन आराखडा तयार करणे.

७.उपरोक्त कार्यक्रमांची माहिती संकलन, संनियंत्रण व मुल्यांकन यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे.

८. उपरोक्त प्रमाणे वनिकी, वनशेती, बांबू लागवड, औषधी वनस्पती लागवड व हरित महाराष्ट्रा संदर्भात कौशल्य विकास होण्यासाठी DPR तयार करणे व

त्यासाठी केंद्र शासन/ राज्य शासन/ केंद्र शासनाचे मंडळ/ संस्था, राज्यशासनाचे मंडळ/ संस्था व खाजगी उद्योगाकडून CSR Fund, इत्यादी मिळवून सदर लागवड घडवून आणण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन, आयोजन, इत्यादी साठी तसेच प्रशिक्षण व कार्यशाळेचे स्वरूप, व्याप निश्चित करणेसाठी अभ्यासपूर्वक अहवाल तयार करणे.

९. खाजगी मालकीच्या जमिनीवरील वृक्ष तोड करण्यासाठी वन विभागाकडून मंजूरी मिळणे व वाहतूक परवाना मिळवणे याबाबत येणाऱ्या अडचणी, होणारा कालपव्यय, इत्यादीचा अभ्यास करून यामध्ये सुधारणा सुचविणारा अहवाल तयार करणे.

१०. खाजगी क्षेत्रावरील वृक्ष लागवडीमधील लोकांकडून मागणी असलेल्या प्रजाती, त्यांची उपलब्धता, त्यापासून मिळणारे उत्पन्न, पणन व्यवस्था, आर्थिक बाबी इत्यादी बाबत अभ्यास करून अहवाल तयार करणे.

११. कोरडवाहू तसेच पडिक जमिनीवर उपयुक्त प्रजातीची लागवड व त्यामध्यमाने उत्पन्न मिळविण्यासंदर्भात माहिती संकलित करून सविस्तर अहवाल तयार करणे, तसेच या अनुषंगाने जनजागृतीचा सविस्तर आराखडा तयार करणे.

१२. वनशेती, बांबू लागवड तसेच औषधी वनस्पती लागवड यासाठी पारंपारिक तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून किफायतशीर किंमतीत उत्कृष्ट प्रतिच्या रोपांचा पुरवठा करण्यासाठी लक्षित गटांपर्यंत रोपवाटिका तंत्र पोहोचविण्यासाठी अहवाल/ आराखडा तयार करणे.

१३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मालकीच्या राज्यभरात ज्या जमिनी आहेत, त्याची विहीत प्रपत्रात माहिती संकलित करून ७/१२ चा उतारा, इ. सह लँड बँकच्या स्वरूपातीत अहवाल तयार करणे.

१४. सामाजिक न्याय विभागाच्यां मालकीच्या इमारती संबंधात विहीत प्रपत्रात सविस्तर तपशील मिळवून त्याबाबतचा डेटाबेस तयार करणे.

१५. तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्ग (OBC), सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), भटक्या जमाती (VJNT), विशेष मागासप्रवर्ग (SBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) याबाबत कार्यरत विभागाच्या तसेच सारथी संस्थेच्या वापरासाठी तसेच विविध प्रकाराच्या क्षेत्रीय मनुष्यबळासाठी व भविष्यात कार्यान्वित होणाऱ्या या शासकीय संस्थाच्या शासकीय व निमशासकीय इमारती किंवा इमारती मध्ये काही खोल्या वसतीगृह इ. असल्यास त्याबाबत विहीत प्रपत्रात माहिती संकलित करून अहवाल तयार करणे व आवश्यकते नुसार इमारती मिळविण्यासाठी समन्वय साधणे व प्रयत्न करणे.

१६. इतर मागासवर्ग (OBC), सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), भटक्या जमाती (VJNT), विशेष मागासप्रवर्ग (SBC) यांना जातीचे दाखले तसेच या सर्व वर्ग / प्रवर्ग आणि आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) यातील उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून अहवाल तयार करणे व महसूल विभागाच्या संबधित कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी विविध स्तरावर (तालुका/ जिल्हा/ विभागीय / राज्य ) प्रशिक्षण कार्यशाळा इ. द्वारे या विषयी कार्यक्षमता वाढविणेसाठी सविस्तर अहवाल तयार करणे. तसेच सदर प्रशिक्षण, कार्यशाळा इ. साठी ट्रेनिंग मॉडूयल, वाचन साहित्य, वेळापत्रके व तत्सबंधी बाबीचा सविस्तर अहवाल तयार करणे व महसूल विभागाशी समन्वय साधून उपरोक्त विषयी विविध स्तरावरची कार्यशाळा, प्रशिक्षणाचे नियोजन व आयोजित करणे.

१७. संस्थेच्या लक्षित गटामधून वंचित व दुर्लक्षित समूह (marginalized and disadvantaged sections of society) च्या समाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी विविध उद्योगक्षेत्रांशी संपर्क साधून CSR निधी प्राप्त करण्यासाठीचा आराखडा तयार करणे.

१८. संस्थेच्या क्षेत्रीय मनुष्यबळांच्या (जिल्हा, प्रादेशिक विभागस्तरावरच्या) कामाचे मुल्यमापन अहवाल तयार करणे.

१९. जिल्हा व प्रादेशिक स्तरावर ग्रंथालयांची निर्मिती करून ती विकसीत करण्यासाठी व ते चालविण्यासाठी अहवाल तयार करणे

२०. संस्थेच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी विविध शासकीय / निमशासकीय यंत्रणांशी संपर्क साधून संस्थेच्या विविध उपक्रम/ कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता अहवाल तयार करणे.

२१. कृषि उत्पादनांवरील प्रक्रिया साठवणूक, मुल्यवृध्दी, ब्रँडिंग, पणन, निर्यात इत्यादि बाबींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी ‘उत्कृष्टता केंद्र’ (Center of Excellence) आणि संशोधन केंद्र उभारण्यासाठी अहवाल तयार करणे.

२२. शेतकऱ्यांचा ग्राहक, बाजार व निर्यात केंद्र यांच्याशी थेट संबंध प्रस्थापित करण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी कोणती परिणामकारक कार्यवाही उपयुक्त ठरेल यांचा अभ्यास करून अहवाल तयार करणे.

२३. कृषि अर्थव्यवस्थेशी संबंधित विविध बाबी जसे की, कृषि आधार मूल्य, पणन व्यवस्था, कृषि आधारित उद्योग निर्मिती इत्यादी बाबत अभ्यास करून शासनास धोरण ठरविण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल असा अहवाल तयार करणे.

२४. कृषि उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या उद्देशाने Gene Pool Conservation, मृद संधारण, सुधारित पिकपध्दती, किड व रोग यांचे जैविक नियंत्रण याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती करणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढविणे या दृष्टीने त्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी उपाय सुचविणारा अहवाल तयार करणे.

२५. कृषि क्षेत्रातील असंतोष/निराशा दूर करण्याच्या उद्देशाने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पशुपालनाचा जोडधंदा, ग्रामीण पर्यटन, वनशेती, कौशल्य विकास व इतर पर्याय कसे अंमलात येतील याचा अभ्यास करून अहवाल तयार करणे.

२६. कृषि विषयक विविध बाबींची माहिती संकलित करून डेटाबेस तयार करणे आणि हेल्पलाईन व मार्गदर्शन केंद्र विकसीत करण्यासाठी आराखडा तयार करणे.

२७. सारथीच्या कौशल्य विकास कार्यक्रमां करीता खालील बाबींचा समावेश करून खालील प्रमाणे आराखडा / अहवाल इ. तयार करणे/ कार्यवाही करणे:-

To prepare plan, strategies, road maps, etc. including one or more of the following aspects of skill development initiative in SARTHI.

a. Design program for Employment, Self-Employment, Entrepreneurship, Incubation, Special Projects and industry linkages
b. Design of mobilization strategy
c. Developing norms for selection of Training Service Providers (TSPs), including rewards and recognition of top performing TSPs and weeding out poor performers
d. Developing norms for cost, stipends, free lodging & boarding facilities, etc.
e. Design methodologies for monitoring and evaluation of the program including quality parameters
f. Design methodology for post placement tracking of candidates.
g. Design program on re-skilling, up-skilling and Recognition of Prior Learning (RPL).

h. Identification of a few training entities which have been imparting skilling programs as a part of their social commitment (such as industry-based training units, CSR initiatives, spiritual organizations etc.)
i. Developing of skill development and entrepreneurship ecosystem
j. Developing of programs for training of women self-help groups
k. Developing industry linkages and possibilities of public private partnership wherever possible
l. Collaborating with industries which are involved in the providing in-house skill development trainings and self-employment
m. Collaborating with National programs of NSDC and State programs of MSSDS.
n. Gathering and preparation of Functional Requirement specification, system design and review and monitoring of IT/Software implementations and applications like Mobile App to map the various Skill Development Doots of SARTHI, Skill Development Management Information System, Skill Aptitude Tests, Online forms for candidate registration, online assessment, etc. Identify and help in rolling of ICT interventions for awareness programs, develop a policy for Social Media and help in social media campaigns through mediums like Facebook, Twitter, etc. and evolve guidelines in setting up Helpline and Counselling Centres.
o. Preparation of RFP documents for various skill development projects.

28. Design of evaluation of the awareness campaigns and other pilot projects.

29. Design of the monitoring and evaluation of the performance of the team of professionals including “Doots” and others field staff, in whatever name it may be called, for awareness, extension education etc. at the grass root level

३०. सारथी संस्थेचे चालू विविध उपक्रमांची यशस्वीता बाबत विविध मूल्यमापनासाठी [Formative / Process/ Concurrent Evaluation; Summative Evaluations; Outcome Evaluation / Impact Evaluation; Third Party Evaluation] साठी कार्यपध्दती, निकष, माहिती प्रपत्र, विश्लेषण पध्दत (data analysis), इत्यादी विषयी सविस्तर तपशील असलेला अहवाल तयार करणे.

31. Preparing a comprehensive report on Sustainable and Robust Skill & Entrepreneurship development programme in Agriculture & Allied sector, including the following aspects :-

- End to end approach on skilling and linking all the stakeholders of Agriculture Value Chain.
- Creating more jobs in Agriculture & Allied fields.
- Achieving rapid growth in the Agriculture sector through intensive skill development.
- Developing the farmers of the state; as Agriculture entrepreneurs.
- Preparation and maintenance of skill inventory in Agriculture and the allied fields to facilitate individual choices.
- Development of sector specific, skill development plans, in Agricultural and allied sectors.

32. Preparing a comprehensive report on Sectorwise Skill Needs in the fields including the followings and the related activities to these fields:-

(1) **AGRICULTURE** [Seed Production, Plant protection (Pesticides and fertilizer applicator), Primary and Secondary Processing of Farm Produce, Green house / Poly house Installation and Maintenance,

Design, Install and Maintain Micro irrigation system, Farm machinery and Equipment repair & maintenance, Manufacture/ Construct small and medium size food storage structures, Nursery management and marketing, Bee keeping, Seri culture, Pickle, Masala, Papad, etc. making and marketing, Agriculture /Agroforestry / extension / survey / Evaluation services, Post-Harvest Supply Chain Management, Florist, Agri-Information Management, Cultivation of Medicinal Plants, herbs, shrubs, grasses, tubers, trees etc and fruits, flowers, leaves, roots, stem, wood, bark etc of such vegetation.]

(2) **ANIMAL HUSBADRY / DAIRY** [Milk Collection Centre Incharge, Poultry & Goat Farm Supervisor, Indigenous species rearing Supervisor, Bulk Milk Cooler (BMC) operator]

(3) **FISHERY** [Shrimp Farmer, Hatchery (fishery) Production Worker, Aquarium maintenance]

३३. सारथी संस्थेच्या प्रशासकीय कामामध्ये गतिमानता आणणे, तसेच अत्युकृष्ट व्यवस्थापन व विविध उपक्रमांचे मूल्यमापनासाठी, प्रधान सल्लागार (Principal Consultant), व्यवस्थापकीय सल्लागार (Managing Consultant), वरिष्ठ सल्लागार (Senior Consultant), सहयोगी (Associate Consultant) सल्लागार, सहाय्यक सल्लागार (Assistant Consultant) इत्यादी म्हणून पुणे मुख्यालयी कामे करणे.

उपरोक्त यादीत समाविष्ट एकूण विवक्षित कामांव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार आणखी काही कामांचा समावेश भविष्यात करण्यात येईल. उपरोक्त पैकी प्रत्येक कामांचा सविस्तर तपशील, व्याप, कामाचे कालावधी, इत्यादी बाबत अर्जदारांमधून निवडक सेवा निवृत्त अधिकाऱ्यांना कळविण्यात येईल व त्यासाठी आपसात चर्चासत्र आयोजित करण्यात येईल.

भविष्यात समाविष्ठ होणाऱ्या कामाची माहिती http://www.sarthi-maharashtragov.in>NOTICEBOARD>EMPANELHR लिंकवर उपलब्ध होतील व त्यानुसार आवेदन करण्यासाठी अर्जदारांना पुरेशी कालावधी देण्यात येईल. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी पुढील तीन महिन्यापर्यंत http://www.sarthi-maharashtragov.in>NOTICEBOARD>EMPANELHR लिंक पाहत राहावे.

**ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त लिंकवर क्लिक करावे. त्याचे वाचनकेल्यास आणखी सर्व बाबी स्पष्ट होतील. त्याचे वाचन करूनच ऑनलाईन अर्ज करावा.**

**ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. १ नोव्हेंबर २०१९.**